पुण्य नगरी

# विद्यार्थिनींतर्फे सायबर सुरक्षेवर जनजागृती



**म्हसदी**ः जळगाव येथील कवीयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र सायबर सेल व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या सहकार्याने साक्री येथील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती केली.

विद्यापीठातील संगणक विभागाच्या एम. एससी. आय. टी. च्या कुनिका दीपक खैरनार व दर्शना अजय हिरे या विद्यार्थिनींनी विद्यालयात सायबर सुरक्षा या विषयावर प्रोजेक्ट वर्कद्वारे व गट चर्चेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. मोबाईलच्या माध्यमातून विविध ॲप, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम याचे फायदे व तोटे या विद्यार्थिनींनी समजावून सांगितले. याप्रसंगी शिक्षक एस. जी. मोहने, एम.जे. सोनवणे, डी. ए. मगरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.समाधान बागुल, पठाण,योगिता ठाकरे,योगिता नांद्रे उपस्थित होते. प्राचार्य यांनी विद्यार्थिनींचे स्वागत केले. सूत्रसंचलन शिक्षक माने यांनी तर शिक्षक मगरे यांनी आभार मानले.

Smart Dhule Edition
Oct 3, 2023 Page No. 2